* प्रकरण – पाच *

# भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृती : तुलनात्मक अभ्यास

* प्रकरण – पाच *

# भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृती: तुलनात्मक अभ्यास

"कुंपनापलीकडले शेत" या दिलीप चित्र्यांच्या कथासंग्रहात वेगवेगळया कथा आहेत. यात प्रामुख्याने भारतीय लोक अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेले आहेत. ते अमेरिकेत राहतात त्यांना तिथे आलेले अनुभव कथन केलेले आहेत. त्यांना अमेरिकेत राहताना जे वेगळे व विचित्र अनुभव आले त्याचे अगदी स्पष्टपणे लेखन केले आहे. अमेरिकेत राहताना त्यांची मने मात्र भारतीयच राहिली आहेत. त्यामुळे ती प्रत्येक गोष्टीचा विचार भारतीय दृष्टिकोणातून करतात. भारतात अशी परिस्थिती असती तर असे प्रत्येक वेळी त्यांना वाटते. पण या वाटण्यात कुठेही खंत दिसून येत नाही. कारण जे समोर जीवन आहे ते त्यांनी अगदी न खळखळता स्विकारले आहे.

भारतीय संस्कृतीत अजूनही परंपरा पाळल्या जातात. नैतिकतेचे बंधन खूपच घट्ट आहे. चारित्र्य, शील याला खूपच महत्त्व दिले जाते. अगदी माणसाच्या शीलावरून त्याची समाजातील पत ठरवली जाते. त्याग हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. कुटुंबासाठी किंवा एखादया व्यक्तीसाठी लोक पूर्ण जीवनाचा त्याग करणारे आपल्याला भारतीय समाजात पहायला मिळतात.

## पाश्चिमात्य संस्कृतीत 'भोग' हा मुख्य भाग –

जीवन आहे तोपर्यंत त्याचा उपभोग घेणे. ते चैनीत घालवणे एवढीच वृत्ती दिसून येते. 'चकवा' यात यशवंत कानिटकर[1] लिहतात की, एक मुलगी व तिचे बिनधास्त आयुष्य ती कसे जगते. लिंडा नावाची एक तरुणी अमेरिकेतल्या न्यूयॉर्क सारख्या मोठया शहरात एकटी राहते. बारमध्ये काम करणे, बारमध्ये नृत्य करणे. अशी कामे करून ती स्वतःचा उदरनिर्वाह करते. प्रत्येक वेळा जेव्हा लेखक भेटतो तेव्हा ती ओळख दाखवत नाही. तिचे प्रत्येक वेळचे वागणे एक प्रकारचे गूढ वाटते. शेवटी ती जेव्हा लेखकाला भेटते तेव्हा ती अमेरिकन तरुणाशी ज्या

पद्धतीने वागते त्याला चुंबन देते. त्यावरून तिचे चारित्र्य लक्षात येते. पण या गोष्टीबद्दल कुठेही लपवाछपवी दिसून येत नाही. लिंडाचे असे वागणे तिथल्या समाजाला व माणसांना वेगळे वाटतच नाही. व्यक्तिस्वातंत्र्य किती टोकाचे आहे व त्यातून स्वैराचार वळावत आहे. त्याचा हा एक नमुना आहे. व्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार फोफावत आहे. विशेष म्हणजे तिथे इतरांनाही त्याचे काहीच वाटत नाही. भारतात मात्र एकटी मुलगी अशी राहू शकली नसती. एक तर समाजाने तिला कुणाशी तरी लग्न करण्यास भाग पाडले असते. अन्यथा अशा मुली समाजात चारचौघींसारखे जगू शकत नाहीत. इथे नैतिकतेची बंधने अजूनही खूप घट्ट आहेत. लोक पत, अब्रू याला भिऊन वागतात.

'गोष्ट टिना विशपची' या कथेत अजिता काळे[?] यांनी किशोरवयीन मुलींची समस्या मांडली आहे. यात टिना ही नववीत शिकणारी मुलगी आहे. तिचे तिच्याच वर्गातील ज्यो नावाच्या मुलाशी शारीरिक संबंध येतात. या संबंधातून टिनाला दिवस जातात. टिनाला जेव्हा हे समजते तेव्हा ती आई होण्याचा निर्णय घेते. टिनाला आई, वडील, डॉक्टर खूप समजावून सांगतात. अगोदर शिक्षण पूर्ण कर नंतर मुल होऊ देत पण ती कोणाचेही न ऐकता मातृत्व स्विकारते. नंतर थोडया दिवसांनी तिला व तिच्या मुलाला सोडून ज्यो निघून जातो. तेव्हा मात्र तिला नाईलाजाने मुलाला व तिला सांभाळण्यासाठी दूसरा मित्र शोधावा लागतो. म्हणजे हया मुलगीला आपण आई झालो तर काय होईल त्यामुळे किती नुकसान होईल ही गोष्ट लक्षातच येत नाही.

मुळातच तिने एवढया लहान वयात शारीरिक संबंध ठेवणे चूकीचे आहे. त्यातून पुन्हा आई होणे म्हणजे घोडचूक करण्यासारखे आहे. विशेष म्हणजे तिला हे सर्व करीत असताना काहीच वाटत नाही. ती आपला निर्णय लगेच आईबापाला कळवते. आईवडिलही प्रथम समजावून सांगतात. नंतर मात्र तिला घराच्या बाहेर हाकलून लावतात. भारतात अशी परिस्थिती कधीच निर्माण झाली नसती. मुळातच मुलीला लग्नाआधी आई होवू दिले नसते. तिचे गर्भपात केले असते. नंतर लगेच तिचे एखाद्या मुलाशी लग्न करून दिले असते. विनालग्नाची मुले होऊच दिली जात नाहीत. झालीच तर त्या मुलीला व कुटुंबाला वाळीतच टाकले जाते. समाज त्यांच्याशी कोणतेच संपर्क ठेवत नाही. त्याचमुळे भारतीय समाजात

प्रतिष्टा, पन याला घावरून नैतिकतेची बंधनं पाळली जातात. स्वैराचार चालत नाही. म्हणजे उघड उघड तुम्ही एखादयाशी संबंध टेवून राहू शकत नाही. त्यासाठी लग्नच करावे लागते.

'खजुराहो' या कथेत मुकुंद सोनपाटकी यांनी एका हॉटेल चालवणाऱ्या महिलेची माहिती दिली आहे. या कथेतील माहिती वाचून अगदी थक्कच व्हायला होते. हॉटेल चालवणारी पामेला ही तशी दिसायला चांगली आहे. ती व तिचा पती दोघे मिळून हॉटेल चालवत असतात. त्यांची आर्थिक स्थितीही बरी आहे. तरीही पामेला नवऱ्याच्या संमतीने रात्री डान्सबारमध्ये नग्ननृत्य करण्याचे काम करते. खरं म्हणजे त्यांची स्थिती चांगली आहे. त्यामुळे पैसे मिळवण्यासाठी हा मार्ग तिने निवडावा आणि या सर्व गोष्टीला तिच्या पतीची संमती असावी हे वाचून कसेतरी वाटते.

अमेरिकेतली भोगी संस्कृती किती टोकाची आहे असे वाटते. पैसा मिळवण्यासाठी पतीच पत्नीला असला व्यवसाय करण्यास परवानगी देतो. अशा कामातून मिळवलेल्या पैशावर तो आपल्या कुटुंबाची हौस मौज करतो. हे म्हणजे एकदम टोकाचे वाटते. पैसे मिळतात म्हणजे काहीही करायला हरकत नाही असे त्यांना वाटत असावे असे एकूण परिस्थितीवरून वाटते.

भारतीय दृष्टीने या गोष्टीचा विचार केला तर अशा बाईची कमाई खाण्यापेक्षा त्या पतीने जीव दयावा असे लोक म्हणतील. जगण्यासाठी पैसा आवश्यक आहे. पण तो पैसा योग्य मार्गाने मिळवणे तितकेच बंधनकारक आहे. स्त्रियांनी विशेषत: या मार्गाने पैसा मिळवणे म्हणजे कमीपणाचे मानले जाते. असा मिळवलेला पैसा जीवन जगताना पुरुषाने वापरला तर अशा पुरुषाला नालायक म्हणजे कोणत्याच कामाचा नसलेला असे मानले जाते. त्यामुळेच भारतीय समाजात अशा प्रकारे मिळवलेला पैसा जर जीवन जगताना वापरला तर कमीपणाचे मानले जाते.

'कुटे देश माझा' या कथेत अशोक काळे[३] यांनी समाजातील वरिष्ठ लोकांचा जो प्रश्न आहे त्याची माहिती सांगितली आहे. समाजात ज्येष्ट नागरिक जे आहेत त्यांचा फार मोठा गंभीर प्रश्न अमेरिकेत झाला आहे. अशा लोकांसाठी कुणाकडेच वेळ नाही. ज्याला त्याला काहीतरी मिळवायचे आहे. अतिशय जलद जीवनपद्धतीमुळे कुणाकडेही या वयस्क लोकांसाठी वेळ नाही. यावर त्यांनी उपाय काढला आहे. तो म्हणजे 'रिटायरमेंट व्हिलेज' किंवा 'नर्सिंग होम' यात

वृद्धांची सर्व सोय केली जाते. घरातील वृद्धांना त्यांची मुलेच तिथे दाखल करतात. तिथे पैसे भरल्यानंतर त्यांचे खाणे, पिणे, औषध यांची सर्व काळजी घेतली जाते.

पण भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने विचार केला तर घरातील मोठयांना अशा प्रकारे घराबाहेर काढणे म्हणजे चूकीचे मानले जाते. आईवडिलांना शेवटपर्यंत सांभाळणे मुलाचे कर्तव्य मानले जाते. आईवडिलही मुलाजवळ राहणेच पसंत करतात. त्यामुळे घरात मोठी व्यक्ती राहते आपोआपच कुटुंबातील लोकांच्या वागण्यावर वचक, बंधन राहते. मोठी माणसे लहान मुलांना सांभाळण्याचे काम करतात. त्यामुळे आपोआपच मुलांना संस्कार मिळतात. मुलांची योग्य मानसिक वाढ होते. एखादया मुलाने जर आईवडिलांना सांभाळले नाही तर अशा मुलाला समाजात वावरताना लोकांच्या रोषास सामोरे जावे लागते. त्यामुळे बऱ्याचवेळा लोक काय म्हणतील म्हणूनही अशा लोकांना सांभाळले जाते. भारतात सहसा आईवडिलांना कोणी वृद्धाश्रमात दाखल करत नाही. त्यामुळे वृद्धाश्रमात राहणाऱ्यांची संख्या खूप कमी आहे. भारतात 'रिटायरमेंट व्हिलेज' असा प्रकार नाही. वयस्क माणसे कुटुंबाचा एक घटक म्हणूनच राहतात.

अमेरिकेतही उच्च नीच प्रकार असतो. हे 'कुठे देश माझा' अशोक काळे याच्या कथेत आला आहे. अमेरिकेत न्यूयॉर्कचे, मिडवेस्टचे, जॉर्जियाचे असे प्रकार आहेत. त्यांच्यात नात्यात रूसवे फुगवे असतात. त्यांच्यातही नात्यातली गुंतागुंत असते. तिथे मुलांच्यावरून आणि नावावरून सासू-सुनांची भांडणे होतात. इथे कोणीही एकत्र राहत नाही. मुले, आईवडील, आजी आजोबा हे सगळे वेगळे राहतात. पण वर्षअखेरीस ख्रिसमसला सगळे एकत्र येतात. प्रत्येकजण दुसऱ्यासाठी एखादी भेट घेऊन येते. हा सण सर्वजण अगदी उत्साहात घालवतात.

भारत उच्च नीचतेच्या बाबतीत अगदी पुढे आहे. भारतात जाती व्यवस्थेला खूप महत्त्व दिले जाते. इथेतर उच्च जातीचा हलक्या जातीचा असा खूप भेदभाव आहे. एका जातीतले दुसऱ्या जातीत व्यवहार करीत नाहीत. कुटुंबाचे संबंध हे नात्यातच केले जातात. चूकूनही जातीबाहेर संबंध झाल्यास त्या कुटुंबाला त्रास होतो त्यांच्याशी व्यवहार केला जात नाही. जातींची बंधने भारतीय समाजात अजूनही खूप कडक आहेत. भारतातही नात्यात खूप गुंतागुंत असते. सासूबाई, सासरे, जावई, नणंद अशी जी कुटुंबात माणसे असतात त्यांचा मानपान इत्यादी

गोष्टी बऱ्याच प्रमाणात सुनेला सांभाळाव्या लागतात. इथे मुलगीला व मुलीच्या वडीलांना बऱ्याच गोष्टीत माघार घ्यावी लागते. भारतातही सासू-सुनांची, दीर-वहिणी इत्यादींची भांडणे असतात. भारतात मात्र अजूनही मुले, आई वडील, आजी आजोबा एकत्र राहतात. आजी आजोबांना कुटुंबातील मोठी व्यक्ती म्हणून मान असतो. मुलगा व सून आईवडिलांना मुलांना सांभाळतात. एकत्र कुटुंब पद्धती आहे. भारतात एखादया कार्यक्रमाला सर्वजण एकत्र येतात. यावेळी सर्व जातीतील माणसे नातेवाईक अशा कार्यक्रमाला आवर्जून हजर राहतात. ज्याच्या घरी कार्यक्रम आहे त्याला शुभेच्छा देतात. वेगवेगळया वस्तू, कपडे भेट म्हणून देतात. अशा वेळी पुन्हा कपडे भेट म्हणून परत दिले जातात. अशी कार्यक्रमाची पद्धत आहे. कार्यक्रम हे भारतात व अमेरिकेत जवळ जवळ सारख्याच पद्धतीने साजरे केले जातात.

'परदेशवास: एक पत्रात्मक चिंतन' या जयंत भालचंद्र बापट[४] यांच्या पत्रात पूर्ण परदेशातील समाजाचे चित्रण आलेले आहे. या पत्रात त्यांनी अगदी लहान-सहान गोष्टी तपशीलाने दिल्या आहेत. जयंत बापट हे ऑस्ट्रेलियात मेलबर्न येथे राहतात. त्यांनी त्याठिकाणची जीवनशैली कशी आहे भारतीयांच्या जीवनशैलीच्या मानाने कोणत्या बाबतीत भिन्न आहे, हे ही दाखवले आहे. त्यांनी त्यांचे स्वतःचेही अनुभव सांगितले आहेत. त्यावरून त्याठिकाणच्या बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो. तेथील सगळयाच गोष्टी चांगल्या आहेत तसेच सगळयाच गोष्टी वाईट आहेत असेही म्हणता येणार नाही. काही चांगल्या काही वाईट अशा समिश्र आहेत.

व्यक्तीस्वातंत्र्याच्या कल्पना त्यांच्या अगदी पराकोटीच्या आहेत त्यामुळेच १५-१६ वर्षाची मुले आपल्या आईवडिलांना बोर्ड देतात. घरात राहिल्याबद्दल पैसे देतात. मुले कोणताही निर्णय घेताना आईवडिलांना विचारत नाहीत. किंवा आईवडिलांना सांगावेसे देखील वाटत नाही. व्यक्तिस्वातंत्र्य ही दुधारी शस्त्र आहे. मुलं किंवा कुणीच तुमच्यावर अवलंबून राहणार नाही ही गोष्ट जरी खरी असली तरी कोणी तुम्हाला विचारणार नाही ही गोष्ट तेवढीच खरी आहे. स्वतःला पाहिजे तसे वागणे ही गोष्ट सगळयांच्यात इतकी भिनून गेली आहे की १०-१२ वर्षाची मुले आईवडिलांची परवानगी कशातच विचारत नाही. अशा स्वातंत्र्यामुळे तिथल्या कुटुंबांची धूळधाण झाली आहे. स्वातंत्र्यामुळे स्त्री-पुरुषांचे पटत नाही त्यामुळेच कुटुंब, घर ही

संस्था मोडकळीस आली आहे. घटस्फोटाचे प्रमाण ३० टक्के आहे. तर अमेरिकेसारख्या देशात घटस्फोटाचे प्रमाण ४० ते ५० टक्के झाले आहे. त्यामुळे समाजात एकटे स्त्री-पुरूष राहताना दिसतात. घटस्फोटामुळे बराच मानसिक ताण सहन करावा लागत आहे. त्यामुळे वेडे, अर्धवेडे, मानसिक रोगी जास्त आढळतात. बरेच लोक एकाकी आयुष्य घालवताना दिसतात. अशा समाजात वाढणाऱ्या मुलांचे भवितव्य काय असेल असा प्रश्न पडतो. दारू, ड्रग्ज आणि बेसुमार लैंगिक स्वातंत्र्य या तीन असूरांपुढे या मुलांचा टिकाव कसा लागणार असा प्रश्न पडतो. बेसुमार लैंगिक स्वातंत्र्यामुळे हर्पीज व एड्ससारख्या रोगांचे प्रमाण वाढले आहे. व्यक्तीस्वातंत्र्यामुळे लोकांचे पुष्कळ फायदे होत असल्यामुळे तिथे कोण कोणालाच विचारत नाही. उतारवयातील माणसांची या समाजाला तिथल्या माणसांना मुळीच गरज नाही. अशी माणसे एकाकी आयुष्य घालवताना दिसतात. पुष्कळ वेळा त्यांना आयुष्य असह्य होते. त्यामुळे आत्महत्याही करतात. पाश्चिमात्य माणसापुढे असलेल्या या एकलकोंडेपणांच्या दुर्धर व्याधीवर आजतरी काही रामबाण औषध उपलब्ध नाही.

परदेशात काही चांगल्या गोष्टीही आहेत. त्यात स्वत: मेहनत करण्याची तयारी असेल तर माणसाच्या कर्तुत्वाला येथे सीमा नाही आणि महत्त्वाकांक्षेला मर्यादा नाही. येथे माणूस कोणतेही काम करायला लाजत नाही. सुतारकाम, गवंडीकाम, मोटारीच्या लहानमोठया दुरूस्त्या या गोष्टी करायला सगळयांना येते. परदेशात माणूस हरप्रकारचे काम न लाजता करतो त्यामुळे परदेशात मिश्रसमाज आहे. मुल काम करून आत्मनिर्भर बनतात. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगतात. त्यामुळे इथे समानता अनुभवायला मिळते. छान घर, मोटया बागा, घरापुढे बागा, मुलांना मिळणारे उत्तम शिक्षण, कॉलेजचे मोफत शिक्षण हे सर्व सुखसोयींनी युक्त जीवन जगायला मिळतं त्यामुळेच भारतातून तिथे गेलेल्या लोकांनी हे सुखाचं, चैनीचं जीवन तिथे वास्तव्य करण्यास आकर्षित करतं त्यांना स्वर्ग म्हणतात तो हाच असावा असे वाटते. म्हणूनच भारतातून जे लोक परदेशी गेले ते कायमचेच परदेशी झाले. त्यांना तेच जीवन आवडू लागलेले आहे. त्यामुळे स्वत: लेखक म्हणतो "स्वर्ग म्हणतात तो हाच असावा."

भारतीय समाजव्यवस्था -

भारतीय जीवनाची या जीवनाशी तुलना केली तर भारतीय जीवन त्यामानाने अतिशय गरीबीत व हालाखीत जगावे लागते. पण भारतीय संस्कृती व संस्कार हे पाहता आपण सामाजिक स्वास्थ्याच्या बाबतीत खूपच सुखी आहोत हे मान्यच करावे लागेल. भारतीय कुटुंब व्यवस्था ही एक सामाजिक संस्था अतिशय उपयोगी व समाजाची पर्यायाने माणसाची प्रगतीची आहे. हे आता सर्व जगाने मान्य केले आहे.

भारतात विवाहसंस्थाही मजबूत आहेत. त्यामुळेच घटस्फोटांचे प्रमाण खूपच कमी आहे. अपवादात्मक बाबतीतच घटस्फोट होतात. त्यामुळे स्त्री-पुरुष एकटे राहणे, लग्नाच्या अगोदर एकत्र राहणे असे प्रकारच नाहीत. किंवा अपवादात्मक आहेत. मुलांना एकटे रहावे लागत नाही. मुले आईवडील, आजीआजोबा यांच्या प्रेमळ सावलीत कुटुंबात वाढतात त्यामुळे साहजिक त्यांच्यावर योग्य संस्कार होतात.

भारतीय समाजात पाश्चिमात्यांप्रमाणे व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक केलेला नाही. एवढे पराकोटीचे व्यक्तिस्वातंत्र्य नाही. त्यामुळेच मुले आईवडिलांच्या परवानगीशिवाय काही करत नाही. प्रसंगी आईवडिलांसाठी बऱ्याच गोष्टी सोडून देतात तर काही वेळा आईवडील मुलांचे योग्य संगोपन होण्यासाठी करियरच्या संधी सोडताना दिसतात. म्हणजे कुटुंबासाठी त्याग करण्याची तयारी असते. भारतात व्यक्तीपेक्षा कुटुंब श्रेष्ठ मानले जाते. त्यामुळेच वयस्क लोक त्यांचा एकाकीपणा किंवा मुले त्यांचा लैंगिक स्वैराचार, व्यसन इत्यादी गोष्टींना आपोआपच आळा बसतो. प्रत्येकजण समाज काय म्हणेल, कुटुंबातील लोकांना काय उत्तर देणार या दडपणाखाली वागताना दिसतो. त्यामुळेच स्वैराचाराने वागता येत नाही. भारतात प्रत्येक गोष्ट करताना विचार करावा लागतो. मनात येईल तसे वागून चालत नाही.

पाश्चात्य देशात बऱ्याच भौतिक सुविधा असल्या तरी तिथला माणूस सामान्य सुखाला मूकला आहे. तिथे कोणच कुणाची चौकशी करीत नाही. पण भारतात मात्र शेजारी थोड जरी काही झाल तर सगळे चौकशी करायला गोळा होतात. इथे शेजारीच शेजाऱ्याला प्रत्येक गोष्टीत धीर देताना दिसतो. तिथल्या लोकांप्रमाणे एकटे जगावे लागत नाही. सगळीकडे माणसांची गर्दी असते. त्यात आपुलकी दाखवणारे नातेवाईक असतात. त्यामुळेच एकाकीपणाचे वयस्क जीवन

असह्य होण्याचा प्रश्नच येत नाही. वयस्क माणसे कुटुंबात राहतात. वृद्धाश्रमात दाखल करणे असे प्रकार इथे अगदी अपवादात्मक आहेत.

भारतात कामाच्या बाबतीत मात्र प्रत्येक कामाचा एक दर्जा ठरलेला आहे. प्रत्येकजण कोणतेही काम करण्यास तयार नसतो. जास्त शिकलेले लोक गवंडी, सुतार इत्यादी हलकी कामे करण्याचे टाळतात. कामावरून समाजात पत ठरवली जाते. डॉक्टर्स, इंजिनीअर यांना समाजात मान असतो. त्यामानाने सुतार, गवंडीकाम करणाऱ्यांना नसतो. अशाप्रकारे माणसाच्या कामावरून त्याची पत ठरवली जात. त्यामुळेच भारतात सुशिक्षितांची बेकारी खूप दिसते. इथे अपूऱ्या सोयी, सुविधा, पैसा अपुरा असल्यामुळे भौतिक सुविधा अमेरिकेसारख्या मिळत नाहीत. बुद्धीमान लोकांना इच्छित पैसा मिळत नाही. म्हणूनच भारतीय लोक परदेशात जातात. लोकसंख्या जास्त असल्यामुळे जीवनाच्या सर्व गोष्टींवर परिणाम झाला आहे. जगण्यासाठी लागणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजाही पुऱ्या होत नाहीत. त्यामुळेच इथे प्रचंड दारिद्र्य आहे. त्यामुळेच भारतीय लोक पाश्चात्य देशाकडे आकर्षित होतात.

भारतात जीवन जगताना माणूस साध्या साध्या गोष्टीत आनंद घेऊन समाधानाने जगू शकतो. पण ही कला पाश्चात्यांना अवगत नाही. त्यांच्याकडे बंगला, गाडी, पैसा, भौतिक सुविधा हे सगळं असलं तरी आणखी हवं आहे अशीच स्थिती असते. लालसेची वृत्ती वाढतच असते. हे पाहिलं की लक्षात येत की माणसाला हव ते मिळत गेलं की असमाधानाची भूक वाढतच जाते. याबाबतीत भारतीय सुखी आहेत. आहे त्या गोष्टीत समाधान मानून जगण्याची कला त्यांना अवगत आहे.

अमेरिकेतल्या नात्यासंबंधीची जास्त माहिती दिलीप चित्र्यांनी आपल्या 'बार मित्झ्वा' या कथेत दिली आहे. या कथेत चित्र्यांनी एका धार्मिक विधीचे चित्रण केले आहे. त्यातून अमेरिकेतल्या नातेसंबंधावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

अमेरिकन संस्कृतीत प्रत्येक मुलाच्या आयुष्यात 'बार मित्झ्वा' हा कार्यक्रम करतात. मुलगा तेरा वर्षाचा झाल्यानंतर तो प्रौढ झाला आहे असे मानले जाते. त्याला प्रौढत्वाची जाणीव करून देण्यासाठी 'बार मित्झ्वा' हा कार्यक्रम असतो. या समारंभाच्यावेळी पाद्री मुलाला त्याच्या आयुष्यातला पहिला मदयाचा प्याला स्वत:च्या हातानी देतो. तर दर शनिवारी सकाळी चर्चमध्ये

प्रार्थनेला येण्याचे वचन घेतो. असा हा 'बार मित्झ्वा' हा कार्यक्रम असतो. या कार्यक्रमानंतर मुलाच्या आईवडीलांकडून सर्व नातेवाईकांना जेवण असते.

या कार्यक्रमात सर्व नातेवाईक येतात. अमेरिकेतल्या नातेवाईकांचा विचार केला तर ती नाती आपल्यापेक्षा खूपच भिन्न आहेत. नात्यामध्ये पहिली पत्नी तिची मुलं, दुसरी पत्नी तिची मुलं असतात. पहिल्या पत्नीचा आताचा पती, दुसऱ्या पत्नीचा पती, तिची पहिली मुलं, मुलाच्या बापाची आई, त्यांचे पहिले दूसरे वडील असे सर्व नातेवाईक या कार्यक्रमाला बोलावतात. अशा कार्यक्रमात सर्वजण सामील होतात आणि वैशिष्ट्य म्हणजे हया सर्व नातेवाईकांना आवर्जुन बोलावले जाते.

भारतीय समाजाच्या, संस्कृतीच्या दृष्टीने विचार केला तर भारतात असे नातेवाईक कधीच नसतात. एका व्यक्तीची जास्तीत जास्त दोन लग्ने होतात ते ही सर्वांची नाहीत एखादयाचीच होतात. अशा प्रत्येकाला दोन-दोन बायका, किंवा दोन-दोन नवरे असत नाहीत. त्यामुळे त्यांची मुले असा प्रश्नच उद्‌भवत नाही. समजा एखादयाला असे नातेवाईक असेलच तर असे उघड-उघडपणे ते वावरत नाहीत. असे संबंध पुढे चालू ठेवले जातच नाहीत. भारतात सगळीकडे एकाच जोडीदाराबरोबर संसार केला जातो. जरासे पटले नाही तर लगेच घटस्फोट घेतला जात नाही. त्यामुळेच भारतात घटस्फोटाचे प्रमाण अत्यल्प आहे. लैंगिक स्वैराचार करून चालत नाही. लैंगिकतेच्या बाबतीत सामाजिक बंधने खूप कडक आहेत. जर ही बंधने पाळली नाहीत तर समाजात पत कमी होते. अशा व्यक्तींना व्याभिचारी मानले जाते. त्यामुळेच भारतात लैंगिक बंधने पाळली जातात. म्हणूनच अशी नाती भारतात आढळत नाहीत.

भारतात अशा नात्यांना समाजात उजळपणे वावरता येत नाही. ही नाती समाजापासून शक्यतो लपवून ठेवली जातात.

लैंगिकतेच्या बाबतीतून 'बार मित्झ्वा' या कथेचा विचार केला तर अमेरिकन लोक किती स्वैराचार करतात हे लक्षात येते. लैंगिक बंधन पाळले जात नाहीच पण त्याचबरोबर व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक झाल्यामुळेच अशी नाती निर्माण झाली आहेत. त्यांच्या कुटुंबसंस्थेत कुठेच कुटुंबाबद्दल त्याग, स्वार्थत्याग दिसून येत नाही. सगळयांच्यात भोगी वृत्ती दिसून येते.

प्रत्येक गोष्टीचा जास्तीत जास्त उपभोग घ्यायचा आयुष्य चैनीत घालवायचे एवढीच भोगी वृत्ती प्रत्येकात दिसून येते. स्वत:च्या सुखापुढे कुणाचाच विचार केला जात नाही.

भारतात कुटुंबासाठी, मुलांसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे लोक आहेत. बरीच माणसे मुलांच्या भवितव्यासाठी करियरच्या संधी सोडताना दिसतात. भारतात तर बहुतेक स्त्रिया कुटुंबासाठी त्याग करताना दिसतात. म्हणजेच भारतात व्यक्तीपेक्षा कुटुंब श्रेष्ट आहे. कुटुंबासाठी त्यागी वृत्ती दिसून येते.

<u>पाश्चात्य संस्कृतीचे भारतीय समाजव्यवस्थेवर होत चाललेला परिणाम</u> –

भारताला स्वातंत्र्य मिळून आज पन्नास वर्षे उलटून गेली. या पन्नास वर्षात भारताने प्रत्येक क्षेत्रात खूपच प्रगती केली आहे. पण या प्रगती बरोबरच जागतिकीकरणाचे वारेही भारतात आले आहे. या वाऱ्याबरोबर पाश्चिमात्य विचारशैलीही भारतीयांच्या जीवनात प्रवेश करु लागली आहे. मागील पन्नास वर्षात जेवढा बदल झाला नाही तेवढा जास्त बदल या दहा वर्षात झाला आहे. संपर्काची माध्यमे खूपच प्रभावी झाली आहेत. त्यामुळेच जग हे जवळ झाले आहे. इंटरनेट, मोबाईल, फॅक्स इ. सुविधांमुळे जगात कुठल्याही देशात असलेल्या व्यक्तीशी काही क्षणात संपर्क साधता येतो. यामुळेच जगात घडलेली कुठलीही घटना तावडतोब सगळीकडे समजते. संपर्काच्या या सोयीमुळे पाश्चिमात्य विचारशैली भारतीयांच्या जीवनात घुसू लागली आहे.

भारतीयांच्यात उच्चभ्रू समजणारा जो वर्ग आहे. तो वर्ग पाश्चिमात्यांचे अनुकरण करण्यातच धन्यता मानू लागला आहे. चांगले वाईट याचा सारासार विचार न करता परदेशीय आहे म्हटल्याबरोबर स्विकारणे एवढे एकच त्यांनी गृहीत धरले आहे. या उच्चभ्रू वर्गातले लोक पैसा मिळवण्यासाठी परदेशात जातात तिथेच स्थायिक होतात. त्यामुळे त्यांचे विचार जीवन हे पाश्चिमात्य बनून जाते. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या इतर भारतीयांना त्यांच्या जीवनशैलीचे आकर्षण वाटते. त्यामुळे ते भारतीयही तसेच वागण्यास सुरुवात करतात. अशामुळेच भारतीय असून पाश्चिमात्य जीवन हळूहळू अंगीकारले जाऊ लागले आहे. तिथली भोगी वृत्ती, चैनीची चटक भारतीयांना आकर्षित करत आहे. त्याचे परिणाम थोडया थोडया प्रमाणात समाजातल्या

वरच्या व मध्यम वर्गात दिसू लागले आहेत. हळूहळू भारतीय जीवनपद्धती व भारतीयांची विचार करण्याची पद्धती पाश्चिमात्य व्हायला लागली आहे. हे मान्यच करावे लागेल. याचे ज्वलंत समोरचे उदाहरण म्हणजे आजची तरूण पिढी व त्यांचे बदलत जाणारे वागणे याचे देता येईल.

भारतीय समाजात सण, उत्सव या गोष्टी पूर्वीपासून खूप दिमाखात साजऱ्या केल्या जात होत्या पण आता पाहिले तर त्याचे प्रमाण कमी झाले आहे. स्त्रियांचे बरेच सण आज फक्त नावालाच राहिले आहेत. उदाहरणार्थ नागपंचमी, गौरी या सणाला मुली, स्त्रिया खूप खेळत असत. आता कोणालाच जुने खेळ, गाणी येत नाहीत. त्याचऐवजी एखादया फिल्मी गाण्यावर नाचण्यास सांगितल्यास अगदी छोटया मुलीही अगदी हुबेहूब त्या अभिनेत्रीसारखे हावभाव करत नाचून दाखवतात. या सर्वांचा कळस म्हणजे असे नाचणे म्हणजे आताच्या आईवडीलांना कौतुकाचे वाटते. पण पूर्वी मुलगी नाचणे म्हणजे कमीपणाचे मानले जायचे म्हणजेच लोकांच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल झालेला आहे.

भारतीय समाज पूर्वापारपासून रूढीप्रिय समाज म्हणून ओळखला जातो. ज्या वाईट रूढी होत्या त्या कायदयाने बंद करण्यात आल्या आहेत. पण बऱ्याच चांगल्या रूढी होत्या त्याही आज कालबाह्य होत चालल्या आहेत. उदाहरणार्थ हळदी–कुंकू यासारखे कार्यक्रम यामुळे एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण होत होती. स्त्रिया एकमेकांची दु:खे एकमेकींना सांगत होत्या त्यामुळे त्यांच्यात आपुलकी होती. आता असे एकमेकींना भेटणे सांगणे या गोष्टी होत नाहीत. त्यामुळे माणूस माणसाला परका झाला आहे. ज्याचं त्याचं ज्याचं त्यानचं पाहावं ही दृष्टी निर्माण झाली आहे.

भारतातही अमेरिकेप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्य ही दुधारी शस्त्र हळूहळू फिरू लागलं आहे. याचा पहिला फटका बसला आहे तो म्हणजे कुटुंबसंस्थेला. भारतात पूर्वीसारखी खूप माणसे असलेली एकत्र कुटुंब दिसत नाहीत. आता मुलाचे लग्न झाले की मुलगा आपली पत्नीला घेऊन विभक्त राहतो. मुलं पती–पत्नी एवढस छोटं कुटुंब निर्माण झाल आहे. त्यामुळे अमेरिकेप्रमाणे कुटुंबाचे प्रश्न, समस्या हळूहळू इथे निर्माण व्हायला लागले आहेत. आमचा दोघांचा संसार यात अन्य कोणाचा हस्तक्षेप नको यामुळे आईवडील बाजूला राहतात. जर दोघे नोकरी करणारे

असतील तर पुन्हा मुलांना सांभाळण्याचा प्रश्न निर्माण होतो. मग मुलांचे संगोपन त्याच्यावर होणारे संस्कार असे एकामागून एका प्रश्नांची मालिकाच निर्माण होत आहे.

मुलांबरोबर पुन्हा पौढांचाही प्रश्न निर्माण होत आहे. वयस्क माणसांना कुणी सांभाळायचे असा प्रश्न आता निर्माण होत आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती होती त्यामुळे वयस्क माणसे कुटुंब चालवत होती त्यांचा कुटुंबावर दरारा होता. त्यांचा वचक होता. पण आता त्यांना कोणी विचारेनासे झाले आहे. त्यांनी दोन वेळचे जेवण खावे व गप्प बसावे अशी मानसिकता तरूणांची व मुलांची निर्माण झाली आहे. या दृष्टिकोणामुळे वयस्क व तरुण यांच्यात सतत वाद निर्माण होतात त्यामुळे कुटुंबात वातावरण सतत तणावाचे रहते. सर्वजण तणावखाली वावरताना दिसतात.

तरूण मुले पाश्चात्यांचे अंधानुकरण करू लागले आहेत. त्यामुळे पाश्चात्यांप्रमाणे खाणे, पिणे, वागणे, कपडे या गोष्टी केल्या जाऊ लागल्या आहेत. म्हणूनच आज मुली साडीऐवजी पॅन्ट शर्टमध्ये दिसतात. तोकडया कपडयात वावरताना दिसतात. भारतीय पदार्थ जेवणातसुद्धा या मुलांना आवडत नाहीत. झटपट खादय खाताना दिसतात. त्याचाच परिणाम म्हणजे आजची तरुण मुल खूपच अशक्त दिसतात. खूप श्रीमंत जे लोक आहेत अशा लोकात दारू पिणे म्हणजे प्रतिष्टेचे लक्षण मानले जाऊ लागले आहे. यातूनच पुढे दारूचे व्यसन जडते व पूर्ण आयुष्य नष्ट होते. पण याकडे कोण लक्ष देत नाही. आजची तरूण मुल वागताना अतिशय बेताल वागताना दिसतात. मोटयांचा आदर करणे ही तर भारतीय संस्कृती पण तीच आज विसरत चाललो आहोत. आजची तरुण मुलं मोठयांचा आदर करतच नाहीत. उलट तुमचं काही सांगू नका आता काही चालत नाही आणि आम्ही वागतो तेच बरोबर आहे. अशा गोष्टींमुळे जीवनावर खूप दूरगामी परिणाम झाले आहेत.

व्यक्तीस्वातंज्यामुळे पाश्चात्य देशात ज्या समस्या आहेत त्या आता हळूहळू भारतात निर्माण व्हायला लागल्या आहेत. पाश्चात्यांच्या अनुकरणात भारतीय तरुणांनी व्यक्तीस्वातंज्याचे अनुकरणही केले आहे. त्यामुळे व्यसन, दारू, ड्रग्ज या गोष्टी इथे निर्माण होऊ लागल्या आहेत. वैशिष्टय म्हणजे मिळकतीच्या बाबतीत इथल्या तरुणांनी तिथल्या मुलांचे अनुकरण केले

नाही. अमेरिकेन मुले १४-१५ वर्षाची झाली की पैसा कमवतात व चैनी करतात. पण आमची भारतीय मुलं आईवडिलांच्या मिळकतीवर खुशाल चैनी करताना दिसतात.

व्यक्तीस्वातंत्र्यामुळे एक महत्त्वाची समस्या निर्माण झाली म्हणजे मुले-मुली आपआपल्या पसंतीने लग्ने करू लागली. यात जातीचे बंधन राहिले नाही. अशी लग्ने प्रत्येक वेळी यशस्वी होतीलच असे सांगता येत नाही. बऱ्याचवेळा भावनेच्या आहारी जाऊन, शारीरिक आकर्षणातून चूकीचा जोडीदार निवडला जातो. त्यामुळे अशा झालेल्या लग्नातून सुख मिळण्याऐवजी दु:खच मिळते. भारतात हल्ली प्रेमविवाह हा प्रकार बराच रूढ होत आहे. यात जात कुळ यांचे कोणतेच बंधन नसते. मुलगा मुलगी एकमेकांची पसंती करतात व लग्न करतात. यात घरचे लोक तयार आहेत किंवा नाहीत याचा विचारच केला जात नाही. पूर्वी अशी लग्ने झाली तर अशा मुलांना व त्यांच्या कुटुंबांना वाळीत टाकले जायचे. मुलांचे आईवडील मुलांशी सर्व संबंध तोडत त्यांना पूर्ण आयुष्य सर्वाचा रोष सहन करूनच जगावे लागत असे .पण आता मात्र हा विरोध पहिल्यांदाच काही दिवस असतो नंतर जसा काळ जाईल तसे सर्व व्यवस्थित होत. आई वडील मुलांना घरात घेतात. मुलं चुकली असतील त्यांना आपणच माफ केले पाहिजे. त्यांना आपणच सांभाळल पाहिजे अशी समजूत काढून त्यांच्याशी संबंध प्रस्थापित केले जातात. म्हणजे सर्व काही सुरळीतपणे चालू होते. यावरूनच माणसांच्या मानसिकतेतही फरक पडला आहे हे लक्षात येते.

शैक्षणिक प्रगतीमुळे पूर्वीच्या मानाने भारतीय स्त्रीही अधिक आत्मनिर्भर झाली आहे. पूर्वीच्या स्त्रीप्रमाणे ती आता पुरूषांवर अवलंबून नाही. आता स्त्रियाही प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करू लागल्या आहेत. मुख्यत: त्या आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण झाल्या आहेत त्यामुळे स्त्रिया अन्याय सहन करून घेत नाहीत. पूर्वी स्त्री समाज, नातेवाईक काय म्हणतील म्हणून प्रत्येक वेळी अन्याय सहन करून गप्प बसत होती. पण आता स्त्री जागी झाल्यामुळे अन्याय सहन करीत नाही. त्यामुळे कुटुंबात स्त्री-पुरूष बरोबरीने वागावे मान मिळावा यासाठी वाद होतात. काहीवेळेला वाद विकोपाला जातात व त्याचे रूपांतर घटस्फोटात होत. पूर्वी घटस्फोटाला स्त्री खूप घाबरत असे पण आता तशी ती भित नाही. प्रत्येक गोष्टीत असा बदल झाला आहे.

पाश्चात्यांच्या अनुकरणामुळे शहरीकरण झपाटयाने होत आहे. प्रत्येक माणूस माझे, स्वत:चे एवढाच विचार करताना दिसतो. पाश्चात्यांच्या भोगी वृत्तीने भारतीयांच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात शिरकाव केल्यामुळेच भारतीयांच्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोणच बदलत चालला आहे. हे बऱ्याच गोष्टींवरून स्पष्ट होते. एकूण भारतीय लोकांच्या वागण्याचे तटस्थ दृष्टीने परिक्षण केले तर बराच फरक पडला आहे, पडत चालला आहे हे मान्यच करावे लागेल.

## संदर्भ सूची

१ . कानिटकर यशवंत – "कुंपनापलीकडले शेत" "चकवा"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ठ क . ९३ ते १०७

२ . काळे अजिता – "कुंपनापलीकडले शेत" "गोष्ट टिना विपपची"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ठ क . १ ते १४

३ . काळे अशोक – "कुंपनापलीकडले शेत" "कुठे देश माझा"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ठ क . २३६ ते २५०

४ . बापट जयंत भालचंद्र– "परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ठ क . १४० ते १४९